Instruction of Repayment of CPF Refundable Advance

②

क्र. लेखा/भनिनि/१/एकरकमी/१५२९४
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
लेखा विभाग, भविष्य निर्वाह निधी,
एक्झैला बॅटरी विस्तार इमारत, धारावी मार्ग,
माटुंगा, मुंबई – ४०० ०१९.
दिनांक :– ११/१२/१९९१.

विभागीय परिपत्रक क्रमांक – भ.नि.नि. – ९०

विषय :– अग्रीमाची एकरकमी परतफेड करण्यासाठी परवानगी देणेबाबत–

अंशदायी भविष्य निर्वाह निधी मधून वर्गणीदारांनी उचललेल्या परतावा अग्रीमची एकरकमी परतफेड करण्यास आलेले अर्ज आजतागायत या कार्यालयाकडून मंजूर केले जातात. अलिकडेच म.रा.वि.मंडळ अंशदायी भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळाचे बैठकीमध्ये असा निर्णय घेण्यात आला आहे की, अत्यंत तातडीचे कारणापुरतेच परतावा अग्रीमचे एकरकमी परतफेड परवानगी अर्ज, अग्रीमचे प्रदान करणारे अधिकारी (कार्यकारी अभियंताचे दर्जापेक्षा कमी नसावा) यांनी मंजूर करावेत. अन्यथा ते नेहमीप्रमाणे ह्या कार्यालयास पाठवावेत. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

असे अर्ज मंजूर करतांना अर्जदारांकडून एकूण अग्रीमपैकी ५०% वसूली झालेली आहे असेच अर्ज मंजूरीसाठी ग्राहय धरावेत तसेच एकरकमी वसूल करावयाची राशी व अग्रीमवरील नियमानुसार देय होणारे व्याज स्थानिक अंकेक्षण विभागाकडून तपासून घेऊन मगच संपूर्ण तपशीलासह तसा आदेश काढण्यात यावा. तसेच भरणा केलेल्या रकमेची नोंद अनुसूची मधील रकाना क्रमांक १० ते १२ व एस नमुन्या मध्ये वसूलीच्या संकेत क्रमांकासह न चुकता करावी. अग्रीम मंजूरी आदेशानुसार मंजूर करण्यांत आलेल्या हप्त्यामध्ये अथवा हप्त्याचे रकमेमध्ये बदल अथवा नापरतावा अग्रीमची परतफेड करण्यास मंजूरी देऊ नये.

एकरकमी परवानगी अर्ज मंजूर करतांना विभागीय परिपत्रक क्रमांक पी.एफ.–६० जा.क्र. ७१३२ दिनांक २.३.८७ मध्ये नमुद केलेल्या बाबीचे काटेकोर पालन करण्यांत यावे.

सचिव
म.रा.वि.मंडळ अंशदायी भ.नि.निधी
विश्वस्त मंडळ, मुंबई – १९.

सोबत :– प्रपत्र.

प्रती :–

अग्रेषण यादीप्रमाणे उपविभागीय कार्यालयापर्यंत सर्वांना.